महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

मंगळवार ■ २९ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०३८ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका महायुती एकत्रच – मुख्यमंत्री फडणवीस



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी काळात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुका महायुती म्हणूनच लढणार असल्याचं मोठं विधान केलं आहे. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुतीतत लढण्याचा आमचा प्रयत्न आहे. जिथे शक्य, तिथे महायुतीत लढू, जिथे शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढू. मैत्रीपूर्ण लढत हा नियम नाही, महायुती हा नियम आहे. पण महायुतीतील घटक पक्षांवर टीका करायची नाही असंही फडणवीस यांनी सांगितलं. राज्यात पुढील काही महिन्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ शकतात. सध्याची राजकीय परिस्थिती पाहाता या निवडणुकांबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. या निवडणुकांवर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. आम्ही या निवडणुका महायुती म्हणूनच लढणार असल्याचं त्यांनी म्हटलं, ते वर्धा येथे बोलत होते.

दरम्यान रविवारी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जाऊन शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, त्यानंतर पुन्हा एकदा मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीच्या चर्चेला उधाण आलं आहे, यावर देखील फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'कोण कोणासोबत युती करत आहे, हे गौण आहे. मुंबईच्या जनतेने महायुतीचा महापौर करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे आम्हाला कोणासोबत लढायचे आहे, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल, ते वेगळे लढले किंवा एकत्रित लढले, कसेही होऊ द्या तरीही महापौर महायुतीचाच होणार,' असं यावेळी फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे विधानसभेच्या निवडणुकीत दिसलं**

**महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला विधानसभेच्या निवडणुकीत दिसलं आहे आणि महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल असे फडणवीस म्हणाले. मात्र काही पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे, हे महाराष्ट्राच्या मनातलं आहे असे म्हणणे योग्य नाही. हे फार मोठे स्टेटमेंट होईल असे फडणवीस म्हणाले.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुतीतत लढण्याचा आमचा प्रयत्न आहे. जिथे शक्य आहे तिथे महायुतीत लढू, जिथे शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढू. मैत्रीपूर्ण लढत हा नियम नाही, महायुती हा नियम आहे. मैत्रीपूर्ण लढत हा फक्त अपवाद असू शकतो, काही ठिकाणी तो होईल, काही ठिकाणी होणार नाही, असं फडणवीस यांनी यावेळी म्हटलं आहे.

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील. सुरुवातीला जिल्हा परिषदेची निवडणूक आणि त्यानंतर नगरपालिकेची निवडणूक होईल आणि कदाचित सर्वात अखेरीस महापालिकेची निवडणूक होईल. या निवडणुका आपण महायुतीमध्ये एकत्र लढणार आहोत. स्थानिक स्तरावर काही निर्णय घेण्याचे अधिकार आम्ही देऊ. जिथे अडचणी असतील तेथील लोकांना आमच्याशी चर्चा करावी.पण शक्यतो निवडणुका महायुतीत करायच्या ,जिथे महायुतीत निवडणूक होणार नाही, तिकडे आपल्या मित्रपक्षावर कुठलीही टीका करायची नाही. आपण राज्यात सोबत काम करत आहोत, त्यामुळे आपल्या मित्रपक्षांवर टीका करायची नाही. आपण 2017 साली बघितलं, उद्धवजी आपल्यासोबत सत्तेत होते, रोज आपल्यालाच शिव्या द्यायचे, ते आपल्याला करायचे नाही. महायुती होणार नाही तिथे आपल्याला समन्वय ठेवून मैत्रीपूर्ण लढत करायची आहे. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्या भाजपचं निर्विवाद वर्चस्व दाखवून द्यायचं आहे, असा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपच्या कार्यकर्त्यांना दिला. ते सोमवारी वर्धा येथे आयोजित करण्यात आलेल्या भाजप कार्यकर्त्यांच्या महामंथन मेळाव्यात बोलत होते.

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुतीतत लढण्याचा आमचा प्रयत्न आहे. जिथे शक्य आहे तिथे महायुतीत लढू, जिथे शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढू. मैत्रीपूर्ण लढत हा नियम नाही, महायुती हा नियम आहे. मैत्रीपूर्ण लढत हा फक्त अपवाद असू शकतो, काही ठिकाणी तो होईल, काही ठिकाणी होणार नाही, मुंबईच्या जनतेने महायुतीचा महापौर करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे आम्हाला कोणासोबत लढायचे आहे, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल, ते वेगळे लढले किंवा एकत्रित लढले, कसेही होऊ द्या तरीही महापौर महायुतीचाच होणार असं फडणवीस यांनी यावेळी म्हटलं आहे.**

## थोडक्यात महत्वाचे



## गोविंदवाडी बायपास खड्ड्यात

### वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण मधील दुर्गाडी किल्ला ते पत्रीपूल दरम्यानच्या सर्वाधिक वर्दळीच्या गोविंदवाडी बाह्यवळण रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. या रस्त्याची डावी मार्गिका नवीन रस्ते कामासाठी खोदून ठेवण्यात आली आहे. त्यामुळे वाहन चालक मनमानी पध्दतीने या रस्त्यावरून वाहने चालवित असल्याने या रस्त्यावर दररोज वाहतूक कोंडी होत आहे.

बैलबाजार, गोविंदवाडी रस्ता परिसरातील अनेक नागरिक आपली मोटार, दुचाकी वाहने उलट मार्गिकतून चालवून वाहतूक कोंडीत भर घालत आहेत. या रस्त्याच्या मध्यभागी एकही वाहतूक पोलीस नसल्याने बेशिस्त वाहन चालक त्याचा गैरफायदा घेत आहेत. डोंबिवली, शिळफाटा येथून भिवंडीकडे जाण्यासाठी, भिवंडीतून शिळफाटाकडे जाणारी वाहने गोविंदवाडी बाह्यवळण रस्त्याने धावतात. कल्याण शहरातील शिवाजी चौकातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी बहुतांशी वाहन चालक या बाह्यवळण रस्त्याला प्राधान्य देतात. त्यामुळे गोविंदवाडी रस्ता हा सर्वाधिक वर्दळीचा रस्ता आहे.

या रस्त्यावरून मोटारी, रिक्षा हलक्या वाहनांबरोबर अवजड वाहनांची सतत वर्दळ असते. मागील महिन्यापासून गोविंदवाडी वळण रस्त्यावर खड्डे पडले आहेत.

या रस्त्यावरचे काही गतिरोधक उंचवटे आहेत. खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी तुंबले असल्याने या रस्त्याने जाताना वाहन चालकांना खड्ड्यांचा अंदाज घेत, कसरत करत वाहन चालवावे लागते. खड्ड्यांमुळे संथगतीने वाहने धावत असल्याने या रस्त्यावर दररोज वाहतूक कोंडी होत आहे.

## टिटवाळा - बल्याणी - उंभार्लीतील बेकायदा बांधकामे भुईसपाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - टिटवाळ्यातील भूमाफियांच्या मागे मागील आठ महिन्यांपासून लागलेला पालिकेच्या तोडकामाचा ससेमिरा सुटण्याची शक्यता दिसत नाही. उन्हाळ्यात बेकायदा बांधकामे भुईसपाट करण्यात आल्यामुळे आपण पावसाळ्यात त्या जागी पुन्हा बेकायदा चाळींची बांधकामे करू असा विचार करून असलेल्या भूमाफियांच्या मनसुब्यांवर अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी हातोड्याचे घाव घालण्यास सुरूवात केली आहे. शनिवार, रविवार सुट्टीचा दिवस असुनही पाटील यांनी तोडकाम पथकाच्या साहाय्याने उंभार्ली रस्ता, बल्याणी भागातील २८ जोते आणि दोन बेकायदा चाळी भुईसपाट केल्या.

शनिवार, रविवार सुट्टीच्या दिवशी पालिका अधिकारी प्रभागात फिरकत नाहीत, असा गैरसमज भूमाफियांचा असल्याने शुक्रवारी रात्री काही भूमाफिया बेकायदा चाळी, जोती बांधण्याची कामे सुरू करतात आणि सोमवारी सकाळपर्यंत ही कामे घाईने पूर्ण करून ठेवतात. या नव्या बांधकामांना सफेद रंग मारून ही बांधकामे जुनी आहेत असा देखावा पालिका अधिकाऱ्यांसमोर निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

टिटवाळ्यातील भूमाफियांच्या सर्व क्लृप्त्या माहिती असल्याने साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी आता शनिवार, रविवार सुट्टीचा दिवस असुनही प्रभागात भ्रमंती करून सुट्टीच्या दोन दिवसात नव्याने उभी राहिलेल्या बेकायदा चाळी, जोत्यांची माहिती घेऊन ती तोडकाम पथकाच्या साहाय्याने तात्काळ भुईसपाट करण्याचा सपाटा लावला आहे.

### आ. किसन कथोरे यांच्या प्रयत्नांतून

# रायते गावातील विकास कामांसाठी १ कोटी २७ लाखांचा निधी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण : कल्याण तालुक्यातील रायते पिंपळोली ग्रूप ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या वैष्णोदेवी मंदिर ते रामदास भाऊ गाडे यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन आदर्श सरपंच सौ समिता संतोष सुरोशी यांच्या हस्ते संपन्न झाले. एमएमआरडीए निधी च्या माध्यमातून कार्यसम्राट आमदार .किसनराव कथोरे साहेब यांच्या विषेश प्रयत्नातून रस्याच्या कॉन्किटीकरणाचे हे काम लाभले असून आज सकाळी प्रत्यक्ष कामाला सुद्धा सुरूवात करण्यात आली.त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.**



कल्याण मुरबाड महामार्गा शेजारी वसलेल्या रायते बदलापूर रस्त्याच्या बाजूला वैष्णोदेवी मंदिर ते रामभाऊ गाडे यांच्या घरापर्यंत रस्त्याची अंत्यत दयनीय अवस्था झाली होती, शाळकरी मुले, वयोवृद्ध, महिला, पुरुष यांना चिखल व पाण्यातून ये जा करावी लागत होती. त्यामुळे येथे रस्ता करावा अशी मागणी वारंवार करण्यात येत होती, अखेरीस कार्यसम्राट आमदार किसन कथोरे यांनी विशेष प्रयत्न करुन एम एम आरडीए चा सुमारे१कोटी२७लाख रुपयांचा निधी मंजूर केला, या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यात येणार असून त्या कामाचे भूमिपूजन आदर्श सरपंच सौ.समिता संतोष सुरोशी यांच्या हस्ते आज झाले यावेळी जेष्ठ पत्रकार .जैतूकाका मुठोलकर, माजी सरपंच .संतोष नामदेव सुरोशी, शाखाप्रमुख .भास्कर दशरथ टेंभे,.रामदास सुरोशी, उपसरपंच कु.मयुर सुरेश सुरोशी, माजी उपसरपंच .हरेश अनंता पवार, सदस्य .यतिन बुटेरे, सदस्या सौ.वैशाली भगवान पवार, सदस्य सुभाष जाधव, .विशाल जाधव, निलेश जाधव, जिवन सुरोशी, देवेन सुरोशी, शशिकांत खंडागळे, संतोष वाकचौरे, सचिन पवार, मोरे ताई, जाधव ताई, सुभद्रा विठ्ठल सुरोशी, शरद टेंभे व पत्रकार संजयजी कांबळे, विलास भोईर, ग्रामस्थ व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# कल्याण यार्ड रिमॉडेलिंग प्रकल्प दोन वर्षांत पूर्ण होणार – मध्य रेल्वे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात पायाभूत सुविधांपैकी महत्त्वाचा असलेल्या कल्याण यार्ड रिमॉडेलिंग प्रकल्प मार्च २०२७ मध्ये पूर्ण होणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेतर्फे एका प्रतिज्ञापत्राद्वारे मुंबई उच्च न्यायालयाला देण्यात आली. मुंबई उपनगरीय रेल्वेच्या जाळ्यात कल्याण हे महत्त्वाचे स्टेशन आहे. सध्या कल्याण रेल्वे स्थानकात रोज ४ लाख प्रवासी प्रवास करतात. त्यातून रोज ४५ लाख रुपये महसूल गोळा होतो. मध्य रेल्वेचे हे महत्त्वाचे जंक्शन असून उत्तरेकडे जाणाऱ्या व पुण्याकडे जाणाऱ्या गाड्यांचे विभाजन होते. रोज ७५० मेल व एक्स्प्रेस, उपनगरीय रेल्वे कल्याण रेल्वे स्थानकातून धावतात. सध्या कल्याण रेल्वे स्थानकात ८ फलाट आहेत. सध्या अनेक लोकल व एक्स्प्रेस या फलाट मिळत नसल्याने कल्याण स्थानकाबाहेर उभ्या असतात. कल्याण यार्ड रिमॉडेलिंग प्रकल्पाला ८०० कोटी रुपये खर्च येणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कल्याण रेल्वे स्थानकातील लांब पल्ल्याच्या गाड्या व उपनगरीय रेल्वे लोकल मार्गिकेचे विभाजन होणार आहे. त्यामुळे गाड्यांना विलंब लागतो. कल्याण यार्ड रिमॉडिलिंग काम पूर्ण झाल्यावर लांब पल्ल्याच्या गाड्या व उपनगरीय लोकलच्या मार्गिकांचे विभाजन होऊ शकेल. यामुळे अतिरिक्त फलाट बांधण्यात येणार आहे. त्यामुळे उपनगरीय रेल्वे गाड्या वेळेत धावू शकतील. त्याचबरोबर लांब पल्ल्याच्या गाड्या व मालगाड्यांची वाहतूक सुरळीत होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.





# मुख्यमंत्र्यांनी पुरविला उपमुख्यमंत्र्यांचा हट्ट

### ठाण्याला दिला मर्जीतील पालक सचिव ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असणाऱ्या नगरविकास विभागाकडून सुरु असलेल्या उधळपट्टीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चाप लावल्याच्या वृत्तामुळे राजकीय वर्तुळात एकीकडे खळबळ उडाली असली तरी शिंदे यांचा गृहजिल्हा असलेल्या ठाण्यातील प्रशासकीय वर्तुळावर मात्र आपल्या मर्जीचा अधिकारी बसविण्यात सध्या तरी त्यांना यश आल्याचे चित्र आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्री पद असताना ठाण्याचे जिल्हाधिकारी म्हणून अशोक शिनगारे यांची नियुक्ती करण्यात आली होती.

शिनगारे निवृत्तीच्या वाटेवर असताना या पदावर शिंदे यांच्या निकटवर्तीयाची निवड होणार का अशी चर्चा आहे. भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शिंदे यांना त्यांच्या ठाणे जिल्ह्यात मोकळीक देणार का, याविषयी देखील तर्कवितर्क लढविले जात आहेत. असे असताना या जिल्ह्याचे पालक सचिव म्हणून एकनाथ शिंदे यांच्या निकटवर्तीयाला नियुक्त करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याचे घेतलेल्या एका निर्णयानुसार नवीन सोना यांची ठाणे जिल्ह्याचे पालक सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन सोना हे उपमुख्यमंत्री कार्यालयातील प्रधान सचिव आहेत. राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे मताधिक्य मिळाले. भाजपला या निवडणुकीत अभूतपुर्व असे यश मिळाल्याने देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्री पद आले.

महायुतीने ही निवडणुक तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लढवली. त्यामुळे राज्यात सत्ता आल्याने शिंदे यांच्याकडे पुन्हा मुख्यमंत्री पद येईल अशी त्यांच्या समर्थकांची आशा होती. मात्र तसे झाले नाही.

देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्री मंडळात शिंदे यांच्याकडे उपमुख्यमंत्री पदासोबत गृहनिर्माण, नगरविकास, रस्ते विकास महामंडळासारखी प्रमुख खाती राहीली आहेत. नव्या मंत्री मंडळात उपमुख्यमंत्री यांच्या कार्यालयाचे प्रधान सचिव म्हणून सोना यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

यापुर्वी राज्याच्या आरोग्य विभागात काम केलेले सोना हे शिंदे यांच्या मर्जीतील अधिकारी मानले जातात. शिंदे यांच्याकडे असलेल्या सर्व खात्यांमधील प्रमुख निर्णयांचे समन्वयक म्हणून ते काम पहातात. शिंदे यांच्यासाठी महत्वाच्या असलेल्या ठाणे जिल्ह्याचे पालक सचिव पद सोना यांच्याकडेच सोपवून त्यांनी आपल्या गृह जिल्ह्यावर प्रभाव राखण्यात यश मिळविल्याची चर्चा आहे

## श्रावणातील पहिला सोमवार अंबरनाथ शिवमंदिरात भक्तांची अलोट गर्दी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** श्रावण महिन्यातल्या पहिल्याच सोमवारी ठाणे जिल्ह्यातील प्रसिद्ध अशा अंबरनाथच्या शिवमंदिरात भाविकांनी हजारोंच्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली. सकाळपासूनच मंदिराबाहेर लांबच लांब रांगा लागल्या. मात्र भर पावसात भाविकांना कोणत्याही सुविधांशिवाय दर्शन घ्यावे लागले. भाविकांसाठी छप्पर तर नव्हतेच पण येथे पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहांची तात्पुरती सुविधाही करण्यात आली नव्हती. त्यामुळे भाविकांनी नाराजी व्यक्त केली.









# गीतासार

## अध्याय १८
## मोक्षसंन्यासयोगः

अर्जुन उवाच संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् । त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥ १८-१ ॥

अर्जुन म्हणाला, हे महाबाहो, हे हृषीकेशा, हे केशिनिषूदना, मी संन्यास आणि त्याग यांचे तत्त्व वेगवेगळे जाणू इच्छितो. ॥ १८-१ ॥

श्रीभगवानुवाच काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः । सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ १८-२ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, कित्येक पंडित काम्य कर्मांच्या त्यागाला संन्यास मानतात. तर दुसरे काही विचारकुशल लोक सर्व कर्मांच्या फळाच्या त्यागाला त्याग म्हणतात. ॥ १८-२ ॥

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः । यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे ॥ १८-३ ॥

कित्येक विद्वान असे म्हणतात की, सर्व कर्मे दोषयुक्त आहेत म्हणून ती टाकणे योग्य होय आणि दुसरे विद्वान असे म्हणतात की, यज्ञ, दान आणि तप रूप कर्मे टाकणे योग्य नाही. ॥ १८-३ ॥

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम । त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः सम्प्रकीर्तितः ॥ १८-४ ॥

हे पुरुषश्रेष्ठ अर्जुना, संन्यास आणि त्याग या दोहोंपैकी प्रथम त्यागाच्या बाबतीत माझा निर्णय ऐक. कारण त्याग सात्त्विक, राजस व तामस या भेदांमुळे तीन प्रकारचा सांगितला गेला आहे. ॥ १८-४ ॥

# रेसिपी
## फराळी पॅटीस



**साहित्य-**
१ १/४ कप- कोणतेही फराळी पीठ
चार- उकडलेले बटाटे
१/३ कप- भाजलेले शेंगदाणे
एक चमचा- जिरे
चवीनुसार मीठ
तीन- हिरव्या मिरच्या
आले किस
कोथिंबीर
एक चमचा- लिंबाचा रस

**कृती-**
सर्वात आधी एका मोठ्या भांड्यात फराळी पीठ काढा. त्यात चवीनुसार जिरे आणि मीठ घाला. दुसरीकडे, उकडलेल्या आणि मॅश केलेल्या बटाट्यांमध्ये बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या तुकडे, कोथींबीर आणि किसलेले आले घाला आणि सर्वकाही चांगले मिसळा. आता भाजलेले शेंगदाणे बारीक वाटून घ्या आणि मिश्रणात घाला. शेंगदाण्याचे तुकडे खूप चवदार लागतात. तसेच लिंबाचा रस देखील घाला. आता मिश्रणातून गोल पॅटीज बनवा. तसेच फराळी पीठात थोडे पाणी घालून जाड बॅटर तयार करा. आता एका पॅनमध्ये तूप किंवा शेंगदाणा तेल गरम करा. पॅटीज बॅटरमध्ये बुडवा आणि नंतर त्या पॅनमध्ये ठेवा. पॅटीज मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी सोनेरी होईपर्यंत तळा आणि नंतर जास्त तेल काढण्यासाठी किचन नॅपकिनवर ठेवा. तर चला तयार आहे आपले फराळी पॅटिस रेसिपी, उपवासाच्या चटणीसोबत नक्कीच सर्व्ह करा.

# नागपंचमीचे महत्त्व आणि नागदेवतेचे पूजन कसे करावे ?



श्रावणमास म्हणजे सणांचा मास (महिना) असेही या मासाचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. श्रावणातील पहिला सण 'नागपंचमी'चा ! आपल्या कुटुंबाची नागभयापासून सदासर्वकाळ मुक्तता व्हावी, तसेच नागदेवतेचा कृपाशीर्वाद प्राप्त व्हावा', यासाठी प्रतीवर्षी श्रावण शुक्ल पक्ष पंचमीला म्हणजेच नागपंचमीला नागपूजन केले जाते. या दिवशी काही ठिकाणी मातीचा नाग आणून त्याची पूजा करतात, तर काही ठिकाणी वारूळाची पूजा केली जाते. या दिवशी स्त्रिया उपवास करतात. नवीन वस्त्रे, अलंकार परिधान करून नागदेवतेची पूजा करतात आणि त्याला दुधाचा नैवेद्य दाखवतात. या दिवशी काही चिरणे, कापणे वर्ज्य मानले जाते. सनातन संस्थेद्वारा संकलित या लेखात नागपंचमीचा इतिहास आणि महत्त्व पाहणार आहोत.

**1. नागपंचमीचा इतिहास : सर्प यज्ञाच्या सांगतेचा दिवस !**

सर्पयज्ञ करणाऱ्या जनमेजय राजाला आस्तिक नावाच्या ऋषींनी प्रसन्न करून घेतले. जनमेजयाने 'वर मागा', असे म्हटल्यावर सर्पयज्ञ थांबवण्याचा वर त्यांनी मागून घेतला. जनमेजयाने सर्पयज्ञ थांबवला, तो दिवस पंचमीचा होता.

**नागदेवतेला जाणा ज्याच्या शिरी श्रीकृष्ण कान्हा !**

**कालियामर्दनाची तिथी** : श्रीकृष्णाने यमुनेच्या डोहातील कालिया नागाचे मर्दन केले. तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता.

**नागदेवतेची बहिणीवर माया, सदैव त्याची बहिणीवर कृपेची छाया !**

पाच युगांपूर्वी सत्येश्वरी नावाची एक कनिष्ठ देवी होती. सत्येश्वर हा तिचा भाऊ होता. सत्येश्वराचा मृत्यू नागपंचमीच्या आदल्या दिवशी झाला. सत्येश्वरीला तिचा भाऊ नागरूपात दिसला. तेव्हा तिने त्या नागरूपाला आपला भाऊ मानला. त्या वेळी नागदेवतेने वचन दिले की, जी बहीण माझी 'भाऊ म्हणून पूजा करील', तिचे रक्षण मी करीन. त्यामुळेच त्या दिवशी नाग देवतेची पूजा करून प्रत्येक स्त्री नागपंचमी साजरी करते.

नाग हा परमेश्वराच्या अवतारांशी, म्हणजेच सगुण रूपांशी संबंधित आहे. सागरमंथनासाठी कूर्मावताराला वासुकी या नागाने साहाय्य केले होते. श्रीविष्णूच्या तमोगुणातून शेषनागाची निर्मिती झाली. भगवान शंकराच्या अंगावर नऊ नाग आहेत इत्यादी. त्यामुळे नागपंचमीच्या दिवशी नागाचे पूजन करणे, म्हणजे नऊ नागांच्या संघाच्या एका प्रतिकाचे पूजन करणे होय. सागरमंथनाच्या वेळी भगवान शिव जेव्हा हलाहल विष प्यायले तेव्हा शिवाला साहाय्य करण्यासाठी नऊ नाग आले. त्यांनीही हलाहलाचा अंश प्राशन केला. त्यामुळे शिव नागांवर प्रसन्न झाले. नागांनी समस्त सृष्टीचे रक्षण करण्यासाठी दिलेल्या योगदानासाठी 'मनुष्य नेहमी नागांप्रती कृतज्ञ राहून तो नागांची पूजा करेल', असा आशीर्वाद नागांना दिला. तेव्हापासून नऊ नाग मनुष्याला पूजनीय झाले. नऊ नाग हे नऊ प्रकारची पवित्रके (चैतन्यलहरी) ग्रहण करणारे घटक आहेत.

**2. नागपूजनाचे महत्त्व** - 'नागांतील श्रेष्ठ जो 'अनंत' तोच मी', अशी गीतेत (10.29) श्रीकृष्ण आपली विभूती सांगतो.

अनन्तं वासुकिं शेषं पद्मनाभं च कम्बलम् ।
शंखपालं धृतराष्ट्रं तक्षकं, कालियं तथा ।।

अनंत, वासुकी, शेष, पद्मनाभ, कंबल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया अशा नऊ जातींच्या नागांची आराधना करतात. त्यामुळे सर्पभय उरत नाही आणि विषबाधा होत नाही.'

**3. नागपंचमीच्या दिवशी उपवास करण्याचे महत्त्व** - सत्येश्वराचा मृत्यू नागपंचमीच्या आदल्या दिवशी झाला. त्यामुळे भावाच्या शोकात सत्येश्वरीने अन्न ग्रहण केले नाही. त्यामुळे त्या दिवशी स्त्रिया भावाच्या नावाने उपवास करतात. 'भावाला चिरंतन आयुष्य आणि अनेक आयुधांची प्राप्ती होवो आणि तो प्रत्येक दुःख आणि संकट यांतून तारला जावो', हेही उपवास करण्यामागे एक कारण आहे. नागपंचमीच्या आदल्या दिवशी प्रत्येक बहिणीने भावासाठी देवतांकडे हाक मारल्यास त्याचा भावाला लाभ होतो आणि त्याचे रक्षण होते.

**4. निषेध** - नागपंचमीच्या दिवशी काहीही चिरू नये, कापू नये, तळू नये, चुलीवर तवा ठेवू नये इत्यादी संकेत पाळावेत. या दिवशी भूमीखनन करू नये.

**5. नागदेवतेचे पूजन कसे करावे ?**

**नागदेवतेचे चित्र काढणे** : हळदमिश्रित चंदनाने भिंतीवर अथवा पाटावर नागाचे चित्र काढावे (अथवा नऊ नागांची चित्रे काढावीत.) आणि त्या ठिकाणी नागदेवतेचे पूजन करावे. 'अनंतादिनागदेवताभ्यो नमः ।' हा नाममंत्र म्हणत गंध, पुष्प इत्यादी सर्व उपचार समर्पित करावे.

**षोडशोपचार पूजन** : ज्यांना नागदेवतेची 'षोडशोपचार पूजा' करणे शक्य आहे, त्यांनी षोडशोपचार पूजा करावी.

**पंचोपचार पूजन** : ज्यांना नागदेवतेची 'षोडशोपचार पूजा' करणे शक्य नाही, त्यांनी 'पंचोपचार पूजा' करावी आणि दूध, साखर, लाह्या यांचा, तसेच कुळाच्या परंपरेनुसार खीर इत्यादी पदार्थांचा नैवेद्य दाखवावा. (पंचोपचार पूजा : गंध, हळद-कुंकू, पुष्प (उपलब्ध असल्यास दूर्वा, तुळशी, बेल) धूप, दीप आणि नैवेद्य या क्रमाने पूजा करणे.)

**6. पूजनानंतर नागदेवतेला करावयाची प्रार्थना !**

'हे नागदेवतांनो, श्रावण शुक्ल पक्ष पंचमीला मी जे हे नागपूजन केले आहे, या पूजनाने नागदेवता प्रसन्न होऊन मला नेहमी सुख देणाऱ्या होवोत. हे नागदेवतांनो, मी हे जे पूजन केले आहे, त्यात अज्ञानाने वा अजाणतेपणी काही उणे-अधिक झाले असल्यास मला क्षमा करावी. तुमच्या कृपेमुळे माझी सर्व मनोरथ पूर्ण होवोत. माझ्या कुळामध्ये कधीही नागविषापासून भय उत्पन्न होऊ नये', अशी आपल्या चरणी प्रार्थना आहे.'

# कारगिल विजय दिनानिमित्त जीवनदीप महाविद्यालयात शहीदांना श्रद्धांजली




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भारत देश व पाकिस्तान यांच्यात १९९९ मध्ये लडाख येथील कारगिल भागात जे युद्ध झालं त्या युद्धात भारताने आपला तिरंगा फडकवत विजय प्राप्त केला. परंतु या युद्धात अनेक जवान शहीद झाले या शहिदांची आठवण म्हणून आजचा हा २६ जुलै चा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा करण्यात आला. जीवनदीप महाविद्यालयात हा दिवस या शहीद जवानांचे स्मरण करून, देशभक्तीपर गीते सादर करून तसेच शहीद जवानांना सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांनी श्रद्धांजली अर्पण करून साजरा केला. या कार्यक्रमाला जीवनदीप चे प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे व इतर प्राध्यापक वर्ग उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण भालेराव यांनी केले विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या सहभागाने हा कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.


# कुपनलिका खोदणार, पायपीट थांबणार
## आदिवासी वस्तीच्या पाण्यासाठी उपसरपंचांचे आश्वासन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कुडूस : चिंचघर व कुडूस ग्रामपंचायतीच्या हद्दीवर असलेल्या आदिवासी वस्तीला पाण्यासाठी गावाबाहेर पायपीट करावी लागते. याबाबत वृत्तपत्रांमध्ये वृत्त प्रसिद्ध झाले होते. ह्याची दखल घेत चिंचघर ग्रामपंचायतीचे उपसरपंच मनेश पाटील यांनी आदिवासी वस्तीत कुपनलिका खोदून देणार असे आश्वासन दिले आहे त्यामुळे पाण्यासाठीची पायपीट थांबणार असून या आश्वासनानंतर पाड्यातील आदिवासी वस्तीत आनंदाचे वातावरण आहे.

# आज केडीएमसी हद्दीत पाणी नाही



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मोहिली जलशुध्दीकरण केंद्र येथील म.रा. वि.वि कंपनीचा मीटर युनिट जोडणे व जलशुध्दीकरण केंद्रातील विदयुत व यांत्रिकी उपकरणांची देखभाल दुरुस्ती करण्याकरिता मंगळवार दि.२९/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत (८ तास) महापालिकेच्या मोहिली जलशुध्दीकरण केंद्रामधून महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण ग्रामीण विभाग (मांडा-टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी व कल्याण ग्रामीण विभागातील इतर गावे), व कल्याण (पश्चिम) "ब" प्रभाग क्षेत्रातील मिलिंद नगर, योगिधाम, चिकनघर, बिर्ला कॉलेज, मुरबाड रोड परिसरातील येथील होणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तरी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे.

# कांढरोली प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींचे तायक्वांदो स्पर्धेत सुयश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रा.जि.प. शाळा कांढरोली ता.खालापूर या प्रशालेतील दोन विद्यार्थिनींनी नेरूळ येथे पार पडलेल्या तायक्वांदो स्पर्धेत उज्वल यश मिळवून शाळेचा आणि गावाचा गौरव वाढवला आहे. दिव्या वासुदेव पाटील हिने द्वितीय क्रमांक, तर गिरीजा सुभाष दुर्गे हिने तृतीय क्रमांक पटकावून आपल्या कौशल्याची प्रचीती दिली. या यशामागे विद्यार्थिनींच्या चिकाटीबरोबरच पालक, शिक्षक, मार्गदर्शक, शाळा व्यवस्थापन समिती आणि स्थानिक प्रशासनाचे सहकार्य मिळाले .

विद्यार्थिनींच्या प्रशिक्षणासाठी उमेश दुधावडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सोमाणी सर यांच्याकडून आर्थिक मदत मिळाली, ज्यामुळे त्यांना दर्जेदार प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली. प्रशिक्षणाची



जबाबदारी गणेश ठाकरे यांनी समर्थपणे पार पाडली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णू खडे, उपाध्यक्षा सौ. मीनाताई पडवकर तसेच सर्व सदस्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन आणि मदत केली. याशिवाय गट शिक्षणाधिकारी दीपा परब मॅडम आणि केंद्रप्रमुख हेमंत म्हात्रे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन यामध्ये मोलाचे ठरले. श्रीम. जयश्री सुर्वे यांचे पाठबळ त्यांच्यासोबतच शिक्षक विनोद लंके, श्रीम. रुपाली पवार आणि उस्मान शेख यांची प्रेरणा आणि प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या वेळेचे व्यवस्थापन, सहकार्य यामध्ये आपली भूमिका बजावली.

वासुदेव पाटील व सुभाष दुर्गे या पालकांचा विशेष सहभाग राहिला. त्यांनी आपल्या मुलींना आवश्यक वेळ, आधार आणि प्रेरणा देत खंबीरपणे साथ दिली. गावातील ग्रामस्थ आणि इतर पालकवर्गाचाही या यशात मोठा वाटा आहे. हे यश म्हणजे एकत्रित प्रयत्नांची फलश्रुती असून दिव्या आणि गिरीजा यांचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास शाळा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### शिवसेनाच्या माध्यमातून
# टावरीपाड्यातील पाण्याचा प्रश्न मार्गी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : टावरीपाडा गावातील जुन्या जलवाहिनीचा प्रश्न समस्या शिवसेनाच्या माध्यमातून मार्गी लागला असून नवीन जलवाहिनी टाकणे कामाचा शुभारंभ नुकताच संपन्न झाला.

कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्रमांक ५ टावरी पाडा येथील टावरी पाडा गावासाठी पाणीपुरवठा करणारी पिण्याच्या पाण्याची लाईन १९९४-१९९५ साली टाकण्यात आली होती. ती लाईन जीर्ण झाल्याने स्थानिक भूमिपुत्र, व ग्रामस्थ मंडळ टावरीपाडा येथील नागरिकांना दूषित व अति कमी दाबाने पिण्याचे पाणी येत असे. येथील महिला वर्ग व ग्रामस्थ या समस्येपासून खूप त्रस्त होते. सततच्या तक्रारी येत होत्या. याची दखल घेत गेल्या दोन वर्षापासून कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे सतत या समस्येसाठी शिवसेना युवा सेना जिल्हा चिटणीस, विभाग प्रमुख अंकुश केणे यांनी पाठपुरावा केला होता.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी या तक्रारीची दखल घेत. योग्य ते सहकार्य करीत बारावे जलकुंभ ते टावरीपाडा गाव अशा नवीन जलवाहिनीला मंजुरी दिली असून त्या कामाचा शुभारंभ नुकताच युवा सेना जिल्हा चिटणीस वैभव भोईर यांच्याहस्ते श्रीफळ वाढवून करण्या आला. यावेळी समस्त शिवसैनिक, युवा सैनिक, पदाधिकारी, महिला आघाडी, ग्रामस्थ मंडळ, श्री गणेश मंडळ, श्री शिवशंभो मित्र मंडळ, श्री नागनाथ सेवा मंडळ, महिला मंडळ व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच येथील नागरिकांना उद्भवणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येबाबत लवकरात लवकर नवीन जलवाहिनी काम पूर्ण होऊन शुद्ध व चांगल्या दाबाने पिण्याचे पाणी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन नागरिकांना संबोधित करताना वैभव भोईर व अकुंश केणे यांनी दिले.

# मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



वासिंद : वासिंद विभागासह शहापूर तालुक्यातील अनेक भागातील मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश केला आहे.

शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून, पक्षाचे नेते प्रकाशजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, ठाणे जिल्हा ग्रामीण प्रमुख मारुती धिर्डे, तालुका प्रमुख प्रकाश वेखंडे यांच्या नेतृत्वाखाली तर अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष अनिस मुश्ताक सय्यद यांच्या पुढाकाराने तालुक्यातील विविध भागातील जवळपास दोनशे मुस्लिम समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे.

यामध्ये अनिस मुश्ताक सय्यद यांची पक्षाच्या अल्पसंख्याक विभागातील ठाणे जिल्हा प्रमुख पदी निवड करण्यात आली. तर या पक्षप्रवेशावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील, ठाणे जिल्हा ग्रामीण प्रमुख मारुती धिर्डे, आमदार शांताराम मोरे, तालुका प्रमुख प्रकाश वेखंडे, जिल्हा सहसचिव जगदीश गिरी, उपतालुकाप्रमुख मधुकर गायकर, जेष्ठ कार्यकर्ते पुरुषोत्तम भेरे, तालुका संपर्क प्रमुख जयवंत तारमळे, वासिंद शहर प्रमुख प्रशांत ठाकरे, उपशहरप्रमुख नारायण लोणे, गफुर शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, शिवसेना हि सर्व जाती, धर्म व पंथाला घेऊन चालणारी आहे. तसेच संकटात, वेळ प्रसंगात आपल्याला चांगल्या कामांमध्ये मदत करणारी संघटना असून पक्षाशी नेहमी एकनिष्ठ राहिले पाहिजे त्यामुळे पक्ष संघटनाही मोठी होती आणि तुम्हीही मोठे होता असे मार्गदर्शनपर विचार पक्षाचे नेते प्रकाशजी पाटील यांनी व्यक्त केले. तर पक्षांनी दिलेली जबाबदारी स्वीकारून पक्ष संघटना माध्यमातून विविध प्रश्न व समस्या सोडविण्याबरोबर, पक्ष संघटना बळकटीसाठी प्रयत्नशिल राहणार असल्याचे नवनियुक्त अल्पसंख्याक जिल्हा प्रमुख अनिस सय्यद यांनी म्हटले.




# आजचे राशि भविष्य



**मेष**
व्यावसायिकांसाठी चांगली बातमी असून मोठी डिल होण्याची शक्यता आहे. तुमची काही कामे थांबलेली होती ती पूर्ण होतील.

**वृषभ**
करिअर तसेच व्यवसायात चांगल्या संधी तुमच्या आसपास आहेत त्याचा लाभ घ्या.वादविवादाची परिस्थिती ऑफिसमध्ये निर्माण होईल.

**मिथुन**
तुम्ही स्वतः कामात फोकस ठेवा यामुळे कामे वेळेत मार्गी लागतील. अनेक दिवसांपासून सुरू असलेला ताण आज काहीसा कमी होईल.

**कर्क**
स्पष्ट बोला, त्यामुळे समस्या कमी होतील. ताणतणाव कमी होईल.अपेक्षित धनलाभ झाल्याने मनोबल वाढेल. तुम्ही करिअरसाठी उपयोगी पडेल असे शिक्षण घेण्याचा

**सिंह**
तिर्थयात्रा करण्याची योजना आखणार आहात पण काही कारणामुळे ही यात्रा पुढे ढकलावी लागेल. मंगलकार्यासाठी खर्च करणार आहात.

**कन्या**
तुम्ही शांत राहा आणि संयमाने काम करा. व्यवसायात कोणताही निर्णय घेताना सतर्क राहा. आज जोखीम असणारे काम घेवू नका.

**तूळ**
घरासंदर्भातील मालमत्तेचा काही वाद कोर्ट-कचेरीमध्ये सुरु असेल तर त्यामध्ये निकाल तुमच्या बाजूने असेल. घरात कोणी आजारी असेल तर त्याच्या तब्येतीत

**वृश्चिक**
विचार करत असाल तर त्वरित सुरुवात करा.घरी वातावरण समाधानी असून सगळेजण तुम्हाला कामात मदत करण्यासाठी तयार राहतील.

**धनु**
तुम्हाला उत्तम यश मिळेल. जे जातक फ्रिलान्स काम करतात त्यांना मोठे प्रोजेक्ट मिळण्याची शक्यता आहे. रखडलेली कामे मार्गी लागणार आहेत.

**मकर**
कोणी तुमच्याकडे उधारी मागेल तर देवू नका. आर्थिक स्थिती ठिक असली तरी पैसे जपून वापरा आणि बचत करण्याचा प्रयत्न करा.

**कुंभ**
सुधारणा होणार आहे.तुम्ही परदेशात देखील व्यवसायाचा विस्तार करु शकता.करिअरमध्ये प्रगती आहे. ऑफिसमध्ये तुम्हाला जे काही बोलायचे आहे ते

**मीन**
तुम्ही स्वतःसाठी वेळ काढणार असून खरेदी देखील कराल. तुम्हाला काही नवीन माहिती मिळेल, ही माहिती भविष्यात तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.






# १४ लाख लाडक्या बहिणींना मिळणार फक्त पाचशे रुपये

**लाडकी बहीण योजनेच्या निकषानुसार महिला सधन कुटुंबातील नसली पाहिजे, घरामध्ये कुणालाही सरकारी नोकरी नसली पाहिजे, घरात चारचाकी गाडी नको यासह इतर योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांच्या दीड हजार रुपयांना सरकारने कात्री लावली आहे. त्यानुसार दीड हजार रुपयापैकी केवळ एक हजार रुपये कट करुन केवळ ५०० रुपये खात्यात वर्ग करण्यात येत आहेत.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने लाडकी बहीण योजना लागू केली होती. या योजनेच्या माध्यमातून लाभार्थी महिलांना महिन्याला दीड हजार रुपये देण्याची तरतूद आहे. सुरुवातीला योजनेच्या निकषांकडे दुर्लक्ष करून सरकारने सरसकट लाभ दिला. मात्र निवडणुकांनंतर निकषांची अंमलबजावणी कठोरपणे करण्यास सुरुवात झाली आहे.

लाडकी बहीण योजनेतून आता जवळपास ५० लाख महिला अपात्र ठरविण्यात आलेल्या आहेत. आता साधारण १४ लाख महिलांना केवळ ५०० रुपये मिळणार आहे. कारण या लाभार्थी महिला इतर योजनांचाही लाभ घेत असल्याचं पुढे आलेलं आहे.

सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांची संख्या ५० लक्ष रुपये इतकी आहे. या महिलांनी नियमाबाहेर जाऊन लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज दाखल केले होते आणि त्यानंतर लाभही घेतला होता. यामध्ये काही महिलांचं उत्पन्न हे अडीच लाखांच्या पुढे आहे. त्यामुळे अशा महिलांच्या लाभाला कात्री लावण्यात आलेली आहे. तर काही लाभार्थी महिलांना योजनेच्या लाभापासून दूर ठेवण्यात आलेलं आहे.

लाडकी बहीण ही राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेमुळेच राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार स्थापन झालं, असं महायुतीच्या नेत्यांनीही मान्य केलं. परंतु आता या योजनेची पडताळणी होतेय. येणाऱ्या काळात यातून अनेक महिला बाहेर पडतील, अशी शक्यता आहे.

# कल्याण पूर्वेतील रस्ते घेणार मोकळा श्वास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. २८ (बातमीदार):** महापालिकेमार्फत कल्याण पूर्व पाच/ड प्रभागातील प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमण दूर करण्यासाठी दररोज अतिक्रमण विरोधी विभागामार्फत कारवाई करण्यात येत आहे. या कारवाईत आतापर्यंत एकूण ४१ हातगाड्या, पाच छत्र्या व तीन गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले असल्याची माहिती मिळाली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसह वाहतुकीस अडथळा येऊ नये यासाठी रस्ते मोकळे ठेवण्यावर विशेष भर असल्याचे या वेळी महापालिकेकडून सांगितले जात आहे.

कल्याण पूर्व हा दाट लोकवस्ती व अरुंद रस्ते असलेला भाग म्हणून ओळखला जातो. शहरातील अंतर्गत रस्त्यांवर वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. याही परिस्थितीत अनधिकृत फेरीवाले अतिक्रमण करत रस्त्यावर आपले बस्तान मांडून व्यवसाय करतात. त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होतो. याच दृष्टीने ५-ड प्रभाग क्षेत्राचे सहाय्यक आयुक्त उमेश यमगर यांनी आता कारवाईचा बडगा उगारला असून रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याचे काम हाती घेतले आहे.

ही मोहीम केवळ एका प्रभाग क्षेत्रापुरती मर्यादित न राहता संपूर्ण कल्याण पूर्वेतच राबविली जावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. विशेषतः चार-जे प्रभाग क्षेत्रांतर्गत कोळसेवाडी येथील अपूर्ण कामे झालेल्या रस्त्यांवर अनधिकृत फेरीवाल्यांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून, सायंकाळी येथून वाहन चालवणे दूरच, परंतु पायी चालणेदेखील त्रासदायक होऊन बसले आहे. त्यामुळे प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांमार्फत केली जात आहे.

# महेश गायकवाड पुन्हा शिवसेनेत ?

## महत्त्वाच्या पदावर वर्णी लागणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. २८** कल्याण पूर्वेतील शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख असलेले महेश गायकवाड यांची विधानसभा निवडणूक काळात पक्षातून हकालपट्टी केली होती. पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतरही महेश गायकवाड हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या विविध कार्यक्रमात दिसून येत होते. यानंतर आता आमदार विश्वनाथ भोईर यांनी गायकवाडांची लवकरच शिंदे गटात महत्त्वाच्या पदावर वर्णी लागणार आहे, चिंतेचे कारण नाही, असे म्हणत त्यांच्या घरवापसीवर शिक्कामोर्तब केले आहे. यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. कल्याण पूर्वेतील सांस्कृतिक गणेशोत्सव महामंडळातर्फे गणेश मंडळांसाठी स्पर्धा आयोजित केल्या होत्या. यात सहभागी गणेश मंडळांचा गौरव करून बक्षीस वितरण करण्यात आले. या वेळी विश्वनाथ भोईर यांनी महेश गायकवाड यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.

कल्याण पूर्वेतून विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी महेश गायकवाड हे इच्छुक होते, मात्र भाजप शिवसेना शिंदे गटाची युती असल्याने कल्याण पूर्वेची जागा भाजपच्या गोटात गेली.

माजी आमदार गणपत गायकवाड यांच्याशी असलेले वैर, त्यात त्यांच्या पत्नीला मिळालेली उमेदवारी यामुळे महेश गायकवाड हे नाराज झाले होते. त्यांनी पक्षाच्या विरोधात भूमिका घेत भाजप उमेदवारास विरोध करण्यास सुरुवात केली. यामुळे त्यांची शिवसेना शिंदे गटातून हकालपट्टी करण्यात आली. तरी गायकवाड यांनी अपक्ष उभे राहात निवडणूक लढवली. यात त्यांना पराभव स्वीकारावा लागला.

**केवळ कागदोपत्री हकालपट्टी**

निवडणुका पार पडल्यानंतर महेश गायकवाड हे शिवसेना शिंदे गटातच सक्रिय असल्याचे दिसून येत होते. एकनाथ शिंदे व श्रीकांत शिंदे यांच्या पाठी फिरताना ते सातत्याने दिसून येत होते. यामुळे त्यांची पक्षातून कागदोपत्री केवळ हकालपट्टी झाली होती. महेश हे अपक्ष निवडणूक लढले तरी मनातून ते शिंदे गटातच होते यांसह अनेक राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

भोईर यांनी केलेल्या वक्तव्यानंतर आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांत इतर पक्षांना शह देण्यासाठी शिंदे गटाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. नाराज पदाधिकाऱ्यांना पक्षात मानाचे पद देऊन त्यांना पुन्हा सक्रिय करण्यासाठी पक्षातील वरिष्ठांनी हालचाली सुरू केल्या असल्याचे दिसून येत आहे.

# भिवंडीतील जैन मंदिरात चोरी

## अवघ्या १२ तासांत आरोपीला अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. २८ (वार्ताहर) :** शहरात मोठ्या प्रमाणात घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. त्यातच अशोक नगर या शहराच्या मुख्य वर्दळीच्या भागात असलेल्या रहिवासी क्षेत्रातील जैन मंदिरात झालेल्या चोरीचा छडा लावण्यात शांतीनगर पोलिसांना यश मिळाले आहे. अवघ्या १२ तासांत पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. अशी माहिती शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली आहे.

**अशोक नगर येथील जैन मंदिरात शनिवारी पहाटेच्या सुमारास मंदिराचा दरवाजा तोडून आत शिरलेल्या अज्ञात चोरट्याने मंदिरातील एक लाख 85 हजार रुपये किमतीचे चांदी व पितळेचे साहित्य चोरी केले होते.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अशोक नगर येथील जैन मंदिरात शनिवारी पहाटेच्या सुमारास मंदिराचा दरवाजा तोडून आत शिरलेल्या अज्ञात चोरट्याने मंदिरातील एक लाख ८५ हजार रुपये किमतीचे चांदी व पितळेचे साहित्य चोरी केले होते. मंदिराचे विश्वस्त शांतीलाल गडा यांनी याबाबत शांतीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती.

सहाय्यक पोलिस निरीक्षक योगेश गायकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथकाने मंदिरासह परिसरातील सीसीटीव्हीची तपासणी केली, यात संशयित आरोपीचा चेहरा स्पष्ट झाला. त्यानंतर गुप्त बातमीदाराकडून माहिती घेत साकीब उर्फ सलमान अख्तर याला शिताफीने ताब्यात घेतले, त्याची चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली. त्याच्याजवळून चोरीचा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात शांतीनगर पोलिसांना यश मिळाले आहे.

# विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

## महावितरण विरोधात तीव्र जनआंदोलनाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. २८ (वार्ताहर)** छतावरून घरात पडणारे पावसाचे पाणी थांबवण्यासाठी तो गेला; मात्र विजेच्या झटक्याने त्याचा मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना उल्हासनगरात घडली. उल्हासनगर कॅम्प क्रमांक २ जवळील शास्त्रीनगर परिसरातील पंजाबी कॉलनीमध्ये सोमवारी (ता. २८) दुपारी बाराच्या सुमारास १७ वर्षीय आयुष रॉय हा आपल्या वडिलांसोबत घराच्या गळणाऱ्या छतावर प्लॅस्टिक टाकण्यासाठी गेला होता. या वेळी त्याचा स्पर्श उघड्या विजेच्या तारांना झाला. यात त्याला तीव्र स्वरूपाचा विजेचा शॉक बसला. काही क्षणांतच आयुष बेशुद्ध पडला. तातडीने त्याला मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

**महावितरण विभागाकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आली नाही; मात्र या प्रकारामुळे वीज सुरक्षेच्या मुद्द्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई केली नाही, तर प्रशासनाविरोधात तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.**

कुटुंबीयांसह स्थानिक नागरिकांनी महावितरण विभागाच्या निष्काळजीपणावर तीव्र संताप व्यक्त केला. मृत आयुषच्या नातेवाइकांनी सांगितले की, छतावरून गेलेल्या उघड्या विजेच्या तारांविषयी त्यांनी यापूर्वीच महावितरणकडे तक्रार केली होती; मात्र त्या तक्रारीची दखल घेतली गेली नाही. कोणताही अधिकारी वा कर्मचारी पाहणीसाठी घटनास्थळी आला नव्हता. याच निष्काळजीपणामुळे एका निष्पाप विद्यार्थ्याचा बळी गेला, असा संताप नागरिकांनी व्यक्त केला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. शेजारीपाजारी, मित्रमंडळी आणि नागरिकांनी घरासमोर एकत्र येऊन महावितरणच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. काही नागरिकांनी तर दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

# आर्थिक उत्पन्न वाढीसाठी मीरा-भाईंदर मनपाचे चित्रीकरण धोरण

## घोडबंदर किल्ल्यासह अन्य ३० ठिकाणी चित्रीकरणास महापालिकेची मंजुरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :-** मिरा भाईंदरमधील ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्यासह शाळा, उद्यान व अन्य ३० ठिकाणी चित्रीकरण करण्यास महापालिकेने मंजुरी दिली आहे. महापालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने प्रशासनाने चित्रीकरणाचे हे नवे धोरण निश्चित केले आहे.

मागील काही वर्षांपासून चित्रीकरणाच्या दृष्टीने मिरा भाईंदर शहराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मराठी, हिंदी आणि अन्य भाषेतील महत्त्वाच्या सिनेमांचे तसेच मालिकांचे चित्रीकरण शहरात सतत होत असते. त्यामुळे यातून उत्पन्न मिळवण्यासाठी तसेच शहराला चित्रीकरणाच्या दृष्टीने आदर्श शहर बनवण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेने नुकतेच नव्याने चित्रीकरण धोरण निश्चित केले आहे. यामध्ये चित्रीकरणाची परवानगी प्रक्रिया ऑनलाईन व सुलभ करणे, महापालिकेचे उत्पन्न निश्चित करणे आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना उभारण्याच्या मार्गदर्शक सूचनांचा यात समावेश करण्यात आला आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे शहरात चित्रीकरणावरून वाद उभा राहू नये म्हणून प्रशासनाने ३० ठिकाणाची यादी तयार केली आहे. यामध्ये शाळा, दुभाजक, रस्ता, वाचनालय, किल्ला, सभागृह व अन्य ठिकाणांचा समावेश केला आहे. तसेच शहरात चित्रीकरण करत असताना वाहतूक उपाययोजना, कचरा व्यवस्थापन, आपत्कालीन प्रवेश, अग्निशमन योजना आणि इतर आवश्यक गोष्टींची खबरदारी घेण्याचे सूचित करण्यात आले आहे. याशिवाय परिसराचा आढावा घेतल्यानंतरच चित्रीकरणास परवानगी देण्याचे अधिकार महापालिकेने आपल्याकडे राखून ठेवले आहेत. आणि मराठी चित्रपट, मालिकांना सवलत देणे व स्थानिक तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याची तरतूद धोरणात करण्यात आली आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

**मालमत्ता विभाग**

जाहिर निविदा सुचना क्र. ०९ सन २०२५-२६ (तिसरी मागणी)

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ अन्वयेच्या तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या समावेशक आरक्षणाअंतर्गत दुकान केंद्र (Shopping Center) ही मालमत्ता १० वर्षेसाठी भाडेतत्वावर व्यक्तिंना/संस्थांना देणेबाबत.

१) निविदा विक्री दि. २९/०७/२०२५ ते दि. ११/०८/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत राहील.
२) निविदा स्विकृती दि. २९/०७/२०२५ ते दि. ११/०८/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत राहील.
३) निविदा पूर्व बैठक दि. ०६/०८/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता ;
मा. उप आयुक्त (मालमत्ता) कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.
४) शक्य झाल्यास दि. १२/०८/२०२५ रोजी सायंकाळी ३.०० वाजता;
ई-टेंडरींग विभाग नागरिक सुविधा केंद्र, येथे उघडण्यात येईल.
५) निविदा महापालिकेच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन
विक्री व स्विकृती करता येतील.

सर्व निविदा किंवा कोणत्याही निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवला आहे.

जावक क्रमांक :
कडोंमपा/जसवि/मुका/३३९
दिनांक : २८ जुलै २०२५

सही/-
उप आयुक्त (मालमत्ता)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

# अनधिकृत बांधकामांच्या नळ जोडण्यांवर ठाणे महापालिकेची कारवाई

**दिवा परिसरातील अनधिकृत बांधकामांच्या**
**१४ नळ जोडण्या खंडित,**
**१० पंप जप्त,**
**११ बोअरवेल बंद**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (२८) :** दिवा परिसरातील अनधिकृत बांधकामांच्या १४ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत. ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने केलेल्या कारवाईत १० मोटर पंप जप्त करण्यात आले तर, ११ बोअरवेल बंद करण्यात आल्या. या सर्व नळ जोडण्या अनधिकृतपणे घेण्यात आल्या होत्या. त्यासंदर्भात गुन्हे दाखल करण्याची कारवाईही करण्यात येत आहे.

अनधिकृत बांधकामांना पाणीपुरवठा दिला असल्यास त्याची कागदपत्रे तपासण्यात यावीत. तसेच, बांधकाम अवैध असल्यास नळसंयोजन तात्काळ खंडीत करण्यात यावे, त्याचप्रमाणे महापालिकेच्या जलवाहिनीवरुन अवैधरित्या नळसंयोजन घेतले असल्यास तेही तातडीने खंडीत करावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पाणी पुरवठा विभागास दिले आहेत. त्या अनुषंगाने दिवा प्रभाग समिती क्षेत्रात २५ आणि २६ जुलै रोजी अनधिकृत बांधकामांची नळ जोडणी खंडित करण्याची विशेष मोहीम घेण्यात आल्याची माहिती उपनगर अभियंता (पाणी पुरवठा विभाग) विनोद पवार यांनी दिली. या मोहिमेत अर्धवट बांधकाम असलेल्या तसेच व्याप्त असलेल्या अनधिकृत बांधकामांची पाहणी करून तेथील नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या. पंपही जप्त करण्यात आले असून काही ठिकाणी बोअरवेलही बंद करण्यात आल्याचे पवार यांनी सांगितले.

दिवा प्रभाग समिती क्षेत्रात शिळ-महापे रोड परिसर, दातिवली रोड, शांती नगर, मुनीर कम्पाऊंड या भागांमध्ये ही कारवाई करण्यात आली.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

जुना एस.टी. स्टॅण्ड, कापआळी, भिवंडी ४२१ ३०२, जि.ठाणे
TEL: 02522-55314/55315, FAX: 02522-52074

**बांधकाम विभाग, प्रभाग समिती क्रं.१**
**ई-निवीदा सुचना क्रमांक ४८ सन २०२५/२६**
**(वार्षिक निविदा सन २०२५-२६)**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत खालील नमुद कामाचे निविदा फॉर्म दिनांक :- २९/०७/२०२५ ते दि.:- १२/०८/२०२५ पर्यंत विक्रीस उपलब्ध आहे.

| अनु.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदापत्राची किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १) | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व उड्डाणपुलांची निगा व दुरुस्ती वार्षिक निविदेअंतर्गत करणे. | ९,९९,९५३/- | २३६०/- |

वरील ऑनलाईन निविदा दि.१२/०८/२०२५ पर्यंत दुपारी ४.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच सदरची निविदा ही दि.१३/०८/२०२५ रोजी संध्या. ४.०१ अथवा कार्यालयीन कामकाजाच्या सोई प्रमाणे निविदा समिती समक्ष उघडण्यात येईल. अधिक माहिती महानगरपालिकेच्या mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन प्राप्त होऊ शकेल अथवा नविन शासकीय इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

जावक क्रमांक :
जसंवि/762 दि. 28 जुलै 2025

सही/-
(जमिल पटेल) शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका




# अनधिकृत डेब्रिज टाकणारे दोन डंपर जप्त

## फरार वाहन चालकांना पोलिसांकडून अटक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई परिसरात सिडको संपादित जमीन मोठ्या प्रमाणावर असून अशा ठिकाणी गुपचूप राडा रोडा टाकण्यासाठी आलेले डंपर पकडण्यात आले होते. हि कारवाई सिडको सुरक्षा मंडल अधिकारी आणि वाशी पोलिसांनी संयुक्त रित्या केली होती. मात्र पोलिसांनी अडवताच डंपर चालकांनी डंपर सोडून पळ काढला होता. त्यांना आज ताब्यात घेण्यात पोलिसांनी यश आले आहे.

सिडको महामंडळाने संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या जमीनीवर /भूखंडावर मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे डंपर वाहन चालकांकडून राडा रोडा टाकण्यात येतो. हा राडा रोडा मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असल्याचे निदर्शनास आले आहे. अनधिकृत डेब्रीजला आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्या नेतृत्वाखाली दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग याचे गस्ती पथक अशा गाड्यांवर लक्ष ठेऊन असते. याच पथकाला मंगळवारी मुंबईतून काही डम्पर नवी मुंबईत राडा रोडा टाकण्यास येत असल्याची माहिती मिळाली होती. त्यामुळे सिडको अधिकारी आणि व नवी मुंबई पोलीस विभाग यांच्या सह सिडको कार्यक्षेत्रात मोहिम राबवत असताना मंगळवारी दुपारी ३:३० वाजताचे सुमारास मुंबई बाजूकडून येणारे डंपर क्रमांक एम एच ४३ सी के ७६८१ वरील चालक ईश्वर दिनु महतो, (वय २९ वर्षे, रा. मु. पो. पुनिया देवी, ०२, पोकरीया, भंडारा, बेकारो, नारायणपूर, झारखंड) तसेच डंपर क्रमांक एम एच ४३ सीई ७२५८, वरील चालक जलील फरदीन चुंगीवाले (वय ३७ वर्षे, रा. मु. पो. किणी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) हे डंपर चालक त्यांच्या ताब्यातील डंपर मधून मानवी आरोग्यास धोकादायक असलेला राडा रोडा आढळून आला. मात्र डंपर अडवल्यावर दोन्ही डंपर वरील वाहन चालक पळून गेले. पोलिसांनी त्यांचा शोध घेत त्यांना रविवारी ताब्यात घेतले.


# श्रावण मासानिमित्त पडघा येथे विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : गावाकडून शहराकडे वाटचाल करणाऱ्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे श्रावण महिन्यानिमीत्त विविध आध्यात्मिक कार्यक्रमाव्दारे महीनाभर अंखड हरीनाम सोहळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले आहे.

हिन्दु धर्मीयांसाठी पवीत्र असलेल्या श्रावण महिन्याचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे यावर्षीही वारकरी संप्रदाय मंडळ व ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विठ्ठल रुक्मिणी मंदीर येथे २५ जुलै ते २४ ऑगस्ट पर्यंत पूर्ण महीनाभर अंखड हरीनाम सोहळा घेण्यात येणार असुन त्यामधे दररोज काकड आरती, महीला भजन, सायंकाळी ह.भ.प.रमांकात महाराज शास्त्री (पडघे) यांचे शिवमहापुराण कथा,सामुदायिक हरिपाठ व रात्री नामवंत महाराजांचे सुश्राव्य किर्तन व त्यानंतर महाआरती अशा भरगच्च आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन हरीनाम सोहळ्याची सांगता २४ ऑगस्ट रोजी सकाळी ह. भ. प.महादेव महाराज भोईर(भोईरपाडा) यांच्या काल्याचे किर्तन व महाप्रसादाने होणार असुन. पडघा व परिसरातील नांगरीकांनी श्रवणसुखाचा, महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



नाम स्वरूप भक्ती मनाच्या शुद्धतेसाठीच आहे जोपर्यंत मन ध्यानात एकाग्र होत नाही तोपर्यंत नामस्मरण करा. ध्यानात आनंद वाटत नाही कारण की मन व्यग्र असते. आपले मन ईश्वराला सोडून वारंवार विषयांकडे धावते. माणसाचे मन संसारातील व्यवहारात इतके तद्रूप होते की त्यासाठी तो अनेक पापे करतो. पण आपण पाप करतो याचे त्याला भानही. नसते. ध्यान करता करता मनाला, हृदयाला पाझर फुटला पाहिजे. डोळे पाणावले पाहिजेत आणि हृदयात सात्विक भाव जागृत झाला पाहिजे. ही लक्षणे दिसू लागली की समजा ध्यान सफल झाले. हृदयाच्या भावाशिवाय केली गेलेली भक्ती फलदायी होत नसते. जीव शुद्ध भावाने जर भगवंताची भक्ती करील तर परमात्मा ही प्रेमाने प्रसन्न होईल.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

### म्हसा येथे जीवनदीप महाविद्यालय वाणिज्य विभागामार्फत

# राष्ट्रीय कृषी धोरण २००० या विषयावर विशेष व्याख्यान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



गोवेली : दि. २८ जुलै , २०२५ रोजी महाविद्यालयात वाणिज्य विभागामार्फत राष्ट्रीय कृषी धोरण, २००० या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. २८ जुलै, २००० या वर्षी हे धोरण जाहीर झाले याच अनुषंगाने यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या विशेष व्याख्यानासाठी मार्गदर्शक म्हणून जीवनदीप महाविद्यालय गोवेलीचे प्रा. दिनेश धनगर सर उपस्थित होते. सरांनी उपस्थित विद्यार्थ्यांना खूप छान पद्धतीने राष्ट्रीय कृषी धोरण, २००० बाबत सखोल असे मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना या व्याख्यानातून समाधानकारक उत्तरे मिळाली.

विद्यार्थ्यांमध्ये या धोरणाबाबत जागरूकता निर्माण व्हावी म्हणून विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय कृषी धोरण, २००० यावर आधारित ऑनलाईन पद्धतीने प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली, विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला आणि विद्यार्थ्यांना या बद्दल ऑनलाईन पद्धतीने प्रमाणपत्र ही देण्यात आले. प्रश्नमंजुषा समन्वयक म्हणून प्रा. विजय सोनार सर यांनी काम पाहिले.

या प्रसंगी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. यावेळी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्गांचे विद्यार्थी उपस्थित होते आणि वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. हर्षदा पवार मॅम, प्रा. विजय सोनार सर व प्रा. दिक्षा बोटकुंडले मॅम यांनी विशेष मेहनत घेतली आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

"अनधिकृत बांधकामासंबंधी नागरीकांना जाहिर आवाहन / सूचना"

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना या जाहीर आवाहन / सूचनेद्वारे सुचित करण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या पदनिर्देशित अधिकारी यांचे असे निदर्शनास आले आहे की, महापालिकेच्या हद्दीमध्ये काही व्यक्ती / संस्था / विकासक हे महापालिकेची कोणतीही रितसर परवानगी न घेता बेकायदेशीरपणे अनधिकृत बांधकाम करीत आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये अशा प्रकारची अनधिकृत बांधकामे करणे हा गुन्हा आहे. अशा प्रकारच्या बांधकामांचे छायाचित्र व पंचनामे करण्याचे आदेश ठाणे महानगरपालिकेकडून देण्यात आलेले असून सदर अनधिकृत बांधकामांवर कारवाई करुन ते निष्कासित करणेच्या अनुषंगाने कायदेशीर नोटीसा बजावणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच काही व्यक्ती / संस्था / विकासक हे अनधिकृतपणे आणि बेकायदेशीरपणे अनधिकृत बांधकामे करुन अशा अनधिकृत बांधकामांची खरेदी, विक्रीचे व्यवहार करतात. सदरचे व्यवहार हे पूर्णपणे बेकायदेशीर आहेत. अशा प्रकारची बांधकामे करणे, अनधिकृत बांधकामांचा व्यवहार करणे, अनधिकृत बांधकामांमध्ये सदनिका खरेदी करुन वास्तव्य करणे हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. अशा अनधिकृत बांधकामांसंदर्भात भविष्यात महापालिकेकडून कायदेशीर कारवाई पूर्ण करुन अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेची कारवाई करण्यात येवू शकते. मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल असलेल्या जनहित याचिका क्र. १/२०२० व रिट याचिका क्र. ५८९८/२०२५ मध्ये अशा प्रकारची अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

विकासक यांचेकडून इमारत अधिकृत असल्याबाबतची खोटी / बनावट कागदपत्र तयार करुन सदर इमारतीमधील सदनिका / गाळे नागरिकांना विकले जातात. अशा इमारती मध्ये सदनिका / गाळे खरेदी केल्यास नागरिकांची फसवणूक होऊ शकते. त्यामुळे अशा प्रकारची फसवणूक होऊ नये म्हणून नागरिकांनी सदनिका / गाळे खरेदी करण्यापूर्वी सदरची इमारत / बांधकाम अधिकृत आहे किंवा कसे याबाबत ठाणे महानगरपालिकेच्या शहर विकास विभागाशी संपर्क साधून सविस्तर चौकशी करुन बांधकामाच्या अधिकृतेबाबत खातरजमा करावी.

ठाणे महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता बांधण्यात आलेले अनधिकृत बांधकाम महानगरपालिकेकडून कोणत्याही क्षणी कारवाई करुन तोडण्यात येऊ शकते. अनधिकृत बांधकामांवर कारवाई करुन बांधकाम तोडल्यास त्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांची आर्थिक फसवणूक होऊन नाहक मनस्ताप सहन करावा लागतो.

तरी नागरिकांनी अनधिकृत बांधकाम / इमातीमध्ये सदनिका / गाळे खरेदी करुन नये असे ठाणे महानगरपालिकेकडून जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

ठामपा/पिआरओ/अ.नि. नि वि/४७१/२०२५-२६
दि.२८/०७/२०२५

Pls visit our official web-site
www.thanecity.gov.in

सही/-
उपायुक्त
अतिक्रमण व निष्कासन विभाग
ठाणे महानगरपालिका, ठाणे

# वाडा - मस्तान नाका रस्त्याला जीवघेणे खड्डे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : गेल्या अनेक महिन्यांपासून वाडा भिवंडी रस्त्याचा मुद्दा गाजत असताना वाड्याकडून मस्तान नाका - अहमदाबाद हायवे ला जोडणाऱ्या रस्त्याची अवस्था सुद्धा अत्यंत वाईट झाली आहे.या रस्त्याला जागोजागी जीवघेणे खड्डे पडले असून त्यामुळे प्रवाशांचे अतोनात हाल, गाड्यांचे नुकसान होत असताना प्रशासनाचे मात्र याकडे दुर्लक्ष आहे.ह्या रस्त्यावर आतापर्यंत अनेक अपघात झाले असून अजुन किती जणांचा जीव घेणार असा संतप्त सवाल करीत नागरिकांकडून दुरुस्तीची मागणी केली जात आहे.

# पवित्र श्रावण महिन्यात मांसाहार वर्ज्य का करतात ? - सी.आर.म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : भारतीय संस्कृतीत श्रावण महिन्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. विशेषतः उत्तर भारत, कर्नाटक,महाराष्ट्र व, नेपाळ येथे जास्त पावित्र्य जपले जाते अशी माहिती वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी दिली. पुराणात समुद्र मंथनाच्या वेळी हलाहल विष निर्माण झाले, तेव्हा ते विष प्रधान करून भगवान शंकराने सृष्टीचे रक्षण केले.हे विष एव्हढे भयानक होते की ते महादेवाच्या गळ्याखाली उतरले नाही,त्यामुळे गळा निळसर पडला म्हणून शंकराला निळकंठ नाव पडले. ते तापलेले शरीर थंड करण्यासाठी महादेवाला गंगाजल, बेलपत्र ,दुर्वा ,दूध ,पाणी अर्पण केले जाते.तेव्हापासून श्रावणातील सोमवारी भगवान शंकराची कृपा व्हावी म्हणून व्रत, तप, पूजा अर्चा केली जाते.. यामुळे विवाह,आरोग्य, संतानप्राप्ती इत्यादी मनोकामना पूर्ण होतात. श्रावणात नागपंचमी,रक्षाबंधन, कृष्ण जन्माष्टमी लक्ष्मीव्रत, असे सण येतात.श्रावणात,हिरवीगार शेती,हिरवीगार वनराई,फुला फळांनी बहरलेला निसर्ग पहावयास मिळते.या महिन्यात रुद्राभिषेक,पारायण,हरिपाठ, नामस्मरण याचे आयोजन केले जाते. भक्ती, शुद्धता ,शिस्त याचा संगम भक्तगण यामध्ये दिसून येतो.दीप पूजा झाल्यानंतर श्रावणाच्या पहिल्या दिवसापासूनच मांसाहार वर्ज्य केला जातो. हा मांसाहार का केला जात नाही असा अनेकाना पडलेला प्रश्न आहे.अंधश्रद्धा तर नाही ना? तर नाही हा पवित्र महिना आहे. त्याचे पावित्र्य राखले पाहिजे शरीर ,मन,आत्मा, यांची शुद्धता राखणे अपेक्षित आहे.मांसाहार हा तामसी आहार मानला जातो. यामुळे शरीरात,क्रोध,आळस, वाईट प्रवृती वाढते.तर सात्विक आहाराने मन शांत,प्रसन्न,भक्तिमय राहते. असेही



त्यांनी सांगितले.

श्रावण महिना हा पावसाचा असल्याने,हवामान दमट,आणि बॅक्टेरिया वाढीस पोषक असतो. मासे,अंडी,मांस, हे पदार्थ सहज खराब होतात,आणि ते पचनासाठी जड असतात. या काळात पचनशक्ती कमकुवत असते.हे जड पदार्थ खाल्यास अपचन विषबाधा ,त्वचारोग होऊ शकते.आयुर्वेद सुद्धा या काळात हलके,सात्विक,शाकाहार याला महत्त्व देतो.पावसाळा हा प्रकृतीच्या पुनरुत्पतीचा काळ आहे.या काळात मासे,जलचर प्राणी,कीटक,पक्षी,प्रजनन करतात.मासे,पक्षी,प्राणी यांची शिकार केल्यास नैसर्गिक साखळी बिघडते. त्यामुळे मांसाहार टाळल्यास पर्यावरणावर सकारात्मक परिणाम दिसून येतो.हा संयम,शिस्त,ध्यान,साधना शांती यासाठी पोषक वातावरण शाकाहारच असतो.या महिन्यात सामूहिक उपासना,भक्ती,भजन ,कीर्तन, यांमुळे सामूहिक शुद्धात,पवित्रता जपली जाते. मांसाहार केल्याने याला बाधा येते.. श्रावण महिन्यात मांसाहार न करणे ही अंध श्रद्धा नसून ही जाणीव पूर्वक निमार्ण केलेली सात्विक परंपरा आहे. धर्म,आरोग्य,निसर्ग आणि समाज यांचा समतोल राखणारी परंपरा आहे. म्हणूनच. शिव आणि शक्ती यांची कृपा याच पवित्र महिन्यात होते...शाकाहार करा आरोग्याला जपा.हा आदेश या श्रावणात दिसून येतो असे सी आर म्हात्रे यांनी सांगितले.

# 'मैत्री सेल'च्या माध्यमातून मोफत उद्योगाबाबत मार्गदर्शन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्रामध्ये एखादा उद्योग कसा सुरु करावा, उद्योग सुरू करण्याकरिता लागणारे लायसन्स, परवाने, ना हरकत प्रमाणपत्र, इत्यादी बाबतची माहिती तसेच वेगवेगळया उद्योग स्थापनेमध्ये व चालविण्यामध्ये शासनाकडून मिळणाऱ्या विविध सवलती, अस्तित्वात असलेल्या उद्योगधंद्याबाबतच्या शासनाशी निगडित समस्या, महाराष्ट्रातून विविध उत्पादनाचे विदेशामध्ये एक्सपोर्ट कसे करावे, एक्सपोर्ट करण्याकरिता शासनाकडून मिळणाऱ्या विविध सवलती इत्यादीवर मार्गदर्शन करण्याकरिता उद्योग विभागांतर्गत "मैत्री सेल"च्या १८००-२३३-२०३३ या टोल फ्री क्रमांकाद्वारे मोफत माहिती देण्याची सुविधा सुरू आहे. या टोल फ्री क्रमाकांसोबतच कार्यालयीन ०२२-२२६२२३२२, २२६२२३६१ या दूरध्वनी क्रमांकावरही मार्गदर्शन करण्यात येणार आहे.तरी अधिकाधिक उद्योजकांनी उद्योगाविषयी माहिती मिळविण्याकरिता उद्योग विभागाच्या या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक सोनाली देवरे यांनी केले आहे.

### शहापूर येथे पद्मश्री सिंधुताई सपकाळ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत

# कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : शौर्याचा दिवस म्हणून शूर वीरांना अभिवादन करण्यासाठी पद्मश्री सिंधुताई सपकाळ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शहापूर येथे कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

26 जून या दिवशी राष्ट्रभक्तीच्या भावनेने भारलेला 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री ॲड. मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून कोशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्गंत शौर्याचा दिवस म्हणून शूर वीरांना अभिवादन' करण्यासाठी या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला.

यामध्ये माजी सैनिक प्रभाकर दोंद, निरंजन निकम, प्रशांत देसाई, संजय चौधरी यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन तर माजी सैनिकांच्या वीरपत्नी मीराबाई घोरपडे, संगीता खनिवडेकर यांचा साडी-चोळी व शाल देऊन संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच या दिनाचे औचित्य साधून संस्थेत निबंध लेखन, चित्रकला व रांगोळी या आयोजित स्पर्धांच्या विजेत्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिके व प्रावीण्य प्रमाणपत्रे देऊन सत्कार करण्यात आला. तर प्रवक्ते राजेश खांडे यांनी कारगिल युद्धातील वीरता, बलिदान आणि कर्तव्यनिष्ठा यांचे प्रभावी चित्रण केले.प्रेरणादायी भाषणं व देशभक्ती वातावरणासह श्रद्धांजली, गीत, घोषवाक्य व सांस्कृतिक सहभाग यामार्फत वीर जवानांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमावेळी संस्थेचे प्राचार्य राम अण्णासाहेब हिरे यांसह शिक्षक-शिक्षकेतर व कर्मचारी उपस्थित होते.

# प्राची पाटील 'मुरबाडी बोली' भाषेमुळे सोशल मीडियावर प्रसिद्ध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : सध्या सोशल मीडियावर मुरबाड ( उत्तर कोकण) एक बिनधास्त, तोंडावर खरं बोलणारी, मातीशी जोडलेली तरुणी विशेष चर्चेत आहे – ती म्हणजे प्राची प्रबोधन पाटील, जी "मुरबाडी बाई माणूस"या नावाने आपल्या खास ढंगात लोकांशी संवाद साधते. ग्रामीण जीवन, बाईचा संघर्ष, शेती, गावकी प्रश्न आणि सडेतोड समाजप्रबोधन करणाऱ्या तिच्या विनोदी शैलीतल्या व्हिडिओंनी अल्पावधीतच तिला मोठं नाव मिळवून दिलं आहे.प्राची ह्या मूळच्या ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातल्या. त्यांच प्राथमिक शिक्षण स्थानिक जिल्हा परिषद शाळा किसळ येथे झालं, आणि पुढे त्या मुंबई विद्यापीठातून इंग्रजी पदवी आणि पदवीयुत्तर शिक्षण इंग्रजी साहित्यात घेतले आहे.(एम.ए.बी.एड ) सामाजिक कार्यात रुची असल्यामुळे त्यांनी शार्दूल एजुकेशन फेडरेशन नावाची संस्था गरजू विद्यार्थ्यांकरता सुरू केली आहे जिथे त्या डायरेक्टर आहेत, तसंच रमेश पानसेंनी वर्णिलेल्या आनंद शिक्षण ह्या संकल्पनेवर आधारित बालवर्ग त्या चालवतात आणि शास्त्रीय संगीताच्या विद्यार्थी आहेत.शिक्षणाप्रति रूचि त्यांचे सासरे जामघर (वाडा) येथिल सुरेश नाना पाटील यांच्याकडून मिळाले असून शिक्षण क्षेत्रात त्यांचे सहकार्य मोलाचे आहे.

"माझ्या प्रत्येक शब्दामागे इथलं मातीचं खरं जिवंतपण आहे."मुरबाडीबाई माणूस" ही फक्त व्यक्तिरेखा नाही, ती माझ्या मायमाऊल्यांची जीवनपद्धती आहे. उत्तर कोकणातल्या तमाम बांधवांनी ज्या पद्धतीनं मला ओळख दिली, ती माझ्यासाठी शब्दांपलीकडची आहे. या प्रेमासाठी मी प्रत्येक उत्तर कोकणी माणसाला हृदयपूर्वक धन्यवाद देते. हे तुमचंच व्यासपीठ आहे – मी फक्त तुमचा आवाज बनतेय."

माझ्या वाटचालीत माझ्या आजोळच्या माणसांचा महत्त्वाचा वाटा आहे.आज त्यांच्या मुरबाडी मराठी बोली भाषेच्या व्हिडिओंना जो भरभरून प्रतिसाद मिळत आहे, लोकप्रिय होत आहे याबद्दल त्यांना विचारले असता लहानपणापासून मी खोडकर होति , नविन काहितरी शिकण्याची जिद्द मात्र कायम मनात ठेवत माहेरी आल्यावर अल्याणि व किसळ येथिल ग्रामीण भागातील महिलांच्या बोलि भाषेचे निरिक्षण केले व तसे बोलण्याचा प्रयत्न केला आणी तो यशस्वी झाला याचे श्रेय त्यांनी मुरबाड मधील महिलांना दिले असुन याची सर्व प्रेरणा किसळचे मा.सरपंच जयवंत पडवळ व माझे मामा रमन पडवळ, विश्वनाथ पडवळ यांचे असल्याची प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली असून अल्पावधीतच मला प्रचंड प्रेम व आशीर्वाद देऊन कौतुकाची थाप देणार्या समस्त ठाणे जिल्हासह मुरबाड करांचे त्यांनी विशेष आभार मानले आहेत.

### दुःखद निधन

# कै. पांडुरंग शिवराम पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताचे शहापूर ग्रामीण प्रतिनिधी नरेंद्र पाटील यांचे सख्खे काका कै. पांडुरंग शिवराम पाटील यांचे वयाच्या 95 व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते शेतकरी कुटुंबातील असून शेतीमध्ये विविध प्रकारची पिके घेऊन त्यांनी आपलं आयुष्य कष्ट करून घालवले व आपल्या कुटुंबाचा सांभाळ करून मुलं आणि पुतण्यांवर योग्य ते संस्कार केले. त्यांच्या निधनामुळे पाटील(पानवे) परिवारावर दुःखाचा डोंगर पसरलेला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन विवाहित मुले, सुना नातवंडे विवाहित मुलगी, दोन विवाहित पुतणे सुना नातवंडे व एक पुतणी व जावई असा मोठा परिवार आसुन दशक्रिया विधी शनिवारी 2 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता अकलोली कुंड येथे होणार असून मंगळवारी 5 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता राहत्या घरी घोटगाव येथे उत्तरकार्य संपन्न होणार आहे.

# आर्य पापळ याचे विविध स्पर्धा परीक्षेत सुयश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळाशी केंद्र वावोशी येथील इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण घेतलेला माजी विद्यार्थी कुमार आर्य अमर पापळ याने महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये 84.56 टक्के गुण प्राप्त करून तालुकास्तरावर प्रथम तर जिल्हा गुणवत्ता यादीत चतुर्थ क्रमांक प्राप्त करत शाळेचे नाव तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात उज्वल केले याबद्दल वावोशी परिसरातून अभिनंदन होत आहे. तसेच सन 2024 /25 रोजी घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेत 93.75 टक्के गुण पटकावून जवाहर नवोदय विद्यालय निजामपुर रायगड येथे प्रवेश मिळवला.तसेच राज्यस्तरीय मंथन परीक्षेत खालापूर केंद्रात प्रथम क्रमांक प्राप्त केला तसेच महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळामार्फत घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेत 98 टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक आणि गणित प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्हास्तरावर रौप्य पदक प्राप्त केले. तसेच ऑल इंडिया सैनिक स्कूल परीक्षेत देखील पास होऊन प्रवेश प्रक्रियेस तो पात्र झाला. एकाच वर्षात या सर्व परीक्षा एकाच वर्षात देऊन सर्व परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादित केले. त्याच्या या यशाबद्दल तळाशी शाळेतील मुख्याध्यापिका हेमलता आखाडे सहशिक्षिका अर्चना घाटे तसेच गावातील व वावोशी परिसरामधील अनेकांनी त्याचे खूप खूप अभिनंदन केले.

# बी.एन.एन. कॉलेजच्या वतीने वृक्षारोपण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




भिवंडी: २८ जुलै २०२५ जागतिक निसर्ग दिनाचे औचित्य साधुन पर्यावरणाच्या दृष्टीने पद्मश्री आण्णासाहेब जाधव, भारतीय समाज उन्नती मंडळ, भिवंडी महाविद्यालय (बी.एन.एन. कॉलेज) यांच्या वतीने व भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकचे मा. श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, नियंत्रण अधिकारी तथा उपआयुक्त (उद्यान) तसेच श्री. निलेश संखे, वृक्षअधिकारी तथा मुख्य उद्यान अधिक्षक, उद्यान विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षदिंडीसह वृक्षरोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रम वेळी महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या वतीने पर्यावरण मुक्त चित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमी मा. श्री. विजय जाधव, अध्यक्ष, पद्मश्री आण्णासाहेब जाधव, भारतीय समाज उन्नती मंडळ, भिवंडी महाविद्यालय (बी.एन.एन. कॉलेज), मा. डॉ. श्रीम. सुवर्णा रावळ, प्राचार्य, बी.एन.एन. कॉलेज, श्री. एम. ओ. महाले, प्राध्यापक, डॉ. रुपवते उपप्राचार्य.. श्री. सुरेश अहिरे, प्राध्यापक, पर्यावरण विभाग, श्री. सुरेश जाधव, प्राध्यापक, कॅप्टन एन.सी.सी., श्रीम. भारती चौधरी, प्राध्यापिका, पर्यावरण व आपत्ती व्यवस्थापन, व पद्मश्री आण्णासाहेब जाधव, भारतीय समाज उन्नती मंडळ, भिवंडी महाविद्यालय (बी. एन.एन. कॉलेज) चे सुमारे १००० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उपस्थित होते. सदर कार्यक्रम अंतर्गत पद्मश्री आण्णासाहेब जाधव, भारतीय समाज उन्नती मंडळ, भिवंडी महाविद्यालय (बी.एन.एन. कॉलेज) चे अध्यक्ष मा. श्री. विजय जाधव साहेब यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. तसेच मा. श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, नियंत्रण अधिकारी तथा उपआयुक्त (उद्यान) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी यांनी पर्यावरणाच्या दृष्टीने वृक्षांचे जतन व संवर्धन, प्रदुषणमुक्त कामी नागरीकांनी करावयाचे कार्यवाही तसेच पर्यावरण व समाजाची अविभाज्य नाळ स्वच्छ पाणी आणि समतोल जैवविविधता हे मानवतेसाठी आवश्यकतेची बाब असल्याचे महत्व पटवून देऊन प्लास्टीक टाळणेची उपस्थितांना हरित प्रतिज्ञा दिली. तद्नंतर महाविद्यालय विद्यार्थी मार्फत वृक्ष जतन संवर्धन महत्व बाबतचे तयार करण्यात आलेल्या चित्रप्रदर्शनास मान्यवरांनी भेट देऊन चित्र प्रदर्शनाचे कौतुक केले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.